ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३८ पुणे, बुधवार, १५ मार्च, १९७२ अंक ६


## आतां घरांत एखादा टेलीव्हीजन सेट घ्यावा असा बेत चालला असेल ना तुमचा ?



## त्यासाठीं आमच्या संचित ठेव योजनेखाली बचत करा...

या योजनेमुळे मिळणारा फायदा सर्वाधिक आहे. मुदत ठेवींमध्ये मिळणाऱ्या फायद्यापेक्षाही अधिक !
तुमच्या मनात भरलेल्या त्या नवीन टेलिव्हिजन सेटसाठी या योजनेखाली बचत करा.
मग पाहा खरेदीचा बोजा असा काही जाणवणारच नाही !
खालील कोष्टक पहा म्हणजे तुमच्या हे लक्षात येईल की ही योजना म्हणजे खरोखरी एक वरदानच आहे.

| रक्कम | मुदत (महिने) | परत मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| रु. १००० | १८ | रु. ११०० |
| रु. १००० | ३३ | रु. १२०० |
| रु. १००० | ४६ | रु. १३०० |
| रु. १००० | ६० | रु. १४०० |
| रु. १००० | ६९ | रु. १५०० |

या योजनेखाली शंभर रुपयाच्या पटीमध्ये देखील ठेव स्वीकारली जाते.
आमच्या कोणत्याही शाखेतून अधिक तपशील मिळू शकेल.

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.

## परदेशी बाजारपेठेसाठी आक्रमक धोरण हवे

गोवा चेंबर ऑफ कॉमर्स आणि इतर काही व्यापारी संघटना यांनी स्टेट बँक ऑफ इंडिआचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. टी. आर. वरदाचारी यांचा पणजी येथे सत्कार केला. श्री. वरदाचारी हे निर्यात हमी मंडळाचे अध्यक्षही आहेत. अलीकडे ते आशिआ खंडातील काही देशांच्या दौऱ्यावर गेले होते. सत्कारप्रसंगी आपल्या दौऱ्यात आलेले अनुभव सांगताना ते म्हणाले की भारताच्या शेजारी नांदणारे कितीतरी देश अजून मागासवर्गात मोडणारे आहेत. त्यांच्या मानाने भारत हा प्रगत देशच म्हटला पाहिजे. आशिआतील मागासलेल्या देशांत भांडवल गुंतविण्यास भारताला बराच वाव आहे. त्यातल्या त्यात आग्नेय आशियातील देशात तर तो अधिकच आहे. तथापि ह्या देशातून भारताविषयी आणि त्याने केलेल्या प्रगतीविषयी अद्याप खूपच अज्ञान आहे. भारताने केलेल्या औद्योगिक प्रगतीविषयी त्यांना फारच थोडी कल्पना आहे. त्यामुळे औद्योगिकदृष्ट्या प्रगत झालेला हा देश सोडून इतर देशांकडून आपल्या औद्योगिक विकासाच्या गरजा भागविण्याची वृत्ती ह्या देशांतून दिसून येते. म्हणून भारताने आपल्या प्रगतीची त्यांना यथायोग्य कल्पना दिली पाहिजे. ह्या बाबतीत जपान चांगला जागरूक आहे. औद्योगिक संधी मिळविण्यास आणि व्यापारधंदा करण्यास कोठे व कसा वाव आहे ह्यासंबंधी जपान एकसारखा चौकशी करीत असतो. गिऱ्हाईक मिळविण्यासाठी जपानने एक प्रकारचे आक्रमक धोरण स्वीकारले आहे असे म्हणण्यास हरकत नाही. हिंदी उद्योगपतींनीही दक्ष राहून निर्यात वाढविण्याच्या संधी शोधीत राहिले पाहिजे. बाजारपेठा मिळविण्यासाठी आणि त्या टिकविण्यासाठी आक्रमक पवित्रा घेऊन स्पर्धा करण्यास शिकले पाहिजे. एरव्ही जपानसारख्या प्रगत देशापुढे भारताच्या निर्यातीचा टिकाव लागणे कठीण आहे.

---


## सदोष टोप विकण्याबद्दल कंपनीला दंड

ब्रिटनमधील एका टक्कल पडलेल्या गृहस्थाने केसांचा सदोष टोप दिल्याबद्दल तो देणाऱ्या कंपनीवर दावा लावला. त्याचा निकाल त्याच्या बाजूने लागून कंपनीला ४७५ रुपये दंड ठोठावण्यात आला. सदर गृहस्थाने टक्कल झाकण्यासाठी ५०० डॉलर्स अथवा ३,६५० रुपये मोजून टोप खरेदी केला होता. तेव्हा त्याला तो बरोबर बसलाही होता. पण नंतर १० दिवसांत तो नीट बसेनासा झाला. टोप नीट बसेलच अशी हमी कंपनीने दिलेली होती. पण प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही. टोप वापरल्यामुळे तो वापरणाऱ्या गृहस्थाचे उरलेसुरले केसही नाहीसे होऊ लागले. अर्थातच कंपनीच्या चुकांची त्याला अधिक चीड आली. कंपनीच्या मुख्य अधिकाऱ्यालाही ह्या प्रकाराचा उलगडा करता आला नाही. त्याच्या मताने हा प्रकार एखाद्या दैवी आपत्तीसारखा असावा. म्हणून कंपनी जबाबदार धरली गेली तरी तिचा इलाज नव्हता.


कार्यक्षम आणि फायदेशीर पंपाची परीक्षा कशी कराल?

**किर्लोस्कर 'केडी' मोनोब्लॉक पंप**

● पंपाची बांधणी मजबूत असल्याने झीज कमी व त्यामुळे दुरुस्तीचा खर्च कमी होतो.
● विजेच्या खर्चात बचत होते. ● कमी वेळात जास्त पाणी ओढू शकतो. त्यामुळे कामाचा जलद उरक व मजुरीच्या खर्चात बचत होते.




**खर्चात होणाऱ्या बचतीमुळे किर्लोस्कर 'केडी' पंपाची किंमत लवकर वसूल होते व कर्जफेडीची हमी देता येते.**

सोपी रचना, सुबक कारागिरी, बळकट व आटोपशीर बांधणी या वैशिष्ट्यामुळें किर्लोस्कर 'केडी' पंप अधिक कार्यक्षम असून ते विपुल प्रमाणात पाणी पुरवठा करतात.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि;** उद्योग भवन. टिळक रोड, पुणे २

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १५ मार्च, १९७२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## अधिक रोजगारी निर्माण करण्याच्या योजना

भारतामधील बेकारीचा रोग जुना आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही त्याच्या गंभीरपणाची कल्पना नियोजन करणाऱ्यांना नीटशी आली असे म्हणता येणार नाही. अलीकडे एंजिनिअर्स व शेतीपदवीधर ह्यांच्या बेकारीविषयी विचार करण्यात येऊन थोडीफार उपाययोजना होऊ लागली आहे. परंतु तेवढ्याने बेकारीच्या वर्मावर घाव बसणार नाही ह्याची जाणीव आता झाली आहे. १९७१-७२ सालच्या मध्यवर्ती अंदाजपत्रकात ग्रामीण भागातील बेकारी कमी करण्याच्या दृष्टीने ५० कोटी रुपयांची एक योजना जाहीर करण्यात आली होती. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ती आखण्यात आली आणि कार्यक्रमाच्या उरलेल्या अवधीत आणखी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्याचेही आश्वासन देण्यात आले आहे. परंतु ह्या योजनेची अमलबजावणी नीट होत नाही असे आढळून आल्याने तिचा विचार करण्यासाठी दिल्ली येथे तीन दिवसांचा एक परिसंवाद भरविण्यात आला होता. राज्य सरकारांचे व केंद्र-शासित प्रदेशांचे प्रतिनिधी परिसंवादाला आले होते. योजना नीट कार्यवाहीत आणावयाची तर देशातील प्रत्येक जिल्ह्यात १,००० रोजगार उपलब्ध करावयास पाहिजेत. देशातील ३४५ जिल्ह्यांत अशी रोजगारी निर्माण करावयाची ह्याचा अर्थ एकूण ३ लाख, ४५ हजार नोकऱ्यांची संधी निमाण करणे असा होतो. शिवाय हे साध्य करताना ज्या कामात यंत्रापेक्षा माणसे अधिक गुंतविता येतील अशीच कामे हाती घेण्यात आली पाहिजेत हेही उघडच आहे. निराळ्या शब्दांत सांगावयाचे तर मोठे भांडवल लागणाऱ्या पण दीर्घ कालावधीनंतर प्रचंड प्रमाणावर नोकऱ्या उत्पन्न करणाऱ्या योजना व तात्कालिक फल देणाऱ्या पण अल्प भांडवल लागणाऱ्या योजना ह्यांच्यांत समतोल कसा राखावा असा हा प्रश्न आहे.

---

## पाकिस्तानी रुपयाच्या अवमूल्यनावर मदत अवलंबून

पाकिस्तानच्या लष्करशहांनी बांगला देश हातातून घालविला. तेथील जनतेच्या रास्त मागण्या संगिनीच्या साह्याने दडपून टाकण्याचा अटीतटीचा प्रयत्न केला, आणि भारताबरोबर युद्धही ओढवून घेतले. ह्या सर्व घटनांचा अत्यंत विपरीत असा परिणाम पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर झालेला आहे. आता उरल्यासुरल्या पाकिस्तानात जमेल तशी स्थिर अर्थव्यवस्था उभारण्याचे काम फार बिकट होऊन बसले आहे. त्यासाठी पाकिस्तानला परदेशांच्या आर्थिक मदतीची तातडीची गरज आहे. त्याचबरोबर पूर्वीच्या परदेशीय कर्जाचा ताण सैल होण्याचीही आवश्यकता आहे. पाकिस्तानला परदेशांचे ४०० कोटी डॉलर्सचे देणे आहे. ते देण्याबाबत पाकिस्तानने एकतर्फी तहकुबीही जाहीर केलेली आहे. पण एवढ्याने भागणार नाही. इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाच्या अभ्यासकांनी पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेचा एक आठवडाभर अभ्यास करून काही सूचना केल्या आहेत. त्यात पाकिस्तानी रुपयाचे अवमूल्यन, देशांतर्गत प्रत्यक्ष करात मोठी वाढ, लष्करी खर्चात कपात, इत्यादी सूचना महत्त्वाच्या आहेत. दरम्यान पाकिस्तानने आर्थिक दुरवस्थेला तोंड देण्यासाठी जागतिक नाणेनिधीकडे ५ कोटी डॉलर्सची मागणी केलेली आहे. रुपयाच्या चलनात ३०.५ कोटी रुपये अशी त्यांची किंमत होते. हे कर्ज वर्षभर मुदतीचे असावे अशी पाकिस्तानची मागणी आहे. कर्जाचा उपयोग करून पाकिस्तान आपला घसरलेला परदेशी व्यापार सुरळीत करण्याचा व परदेशीय चलनाच्या साठ्यात पडेल तर खड्डा भरून काढण्याचा प्रयत्न करणार आहे. पाकिस्तानच्या परदेशीय चलनाची गंगाजळी आता अवघी १५ कोटी डॉलर्स अथवा १०९.५ कोटी रुपये इतकीच राहिली आहे. पाकिस्तानी रुपयाचा डॉलरमधील खुला बाजारभाव घसरला असून एका डॉलरची किंमत १० पाकिस्तानी रुपये इतकी खाली आली आहे.

---

## जीप गाड्यांचा भाव वधारला

मध्य प्रदेशातील छत्तीसगड भागात जीपगाड्यांचे रोजचे भाडे खूपच वधारले आहे. निवडणुकीसाठी लागणारी वाहने कमी पडत असल्यामुळे एका जीपगाडीला दिवसाकाठी १६० ते २२५ रुपये द्यावे लागत होते. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी आणि लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीपर्यंत भाव १०० ते २०० रुपये इतका होता. छत्तीसगड भागात ८४ मतदारसंघ आहेत. तेथील मतदारांपर्यंत प्रचार पोचविण्यासाठी ह्या भागात २०० जीपगाड्या व तितकीच इतर वाहने धावपळ करीत होती. भारत-पाक युद्धामुळे विधान सभा निवडणुका होतील की नाही ह्याची खात्री नव्हती. त्यामुळे जुन्या दुरुस्त करता येण्यासारख्या गाड्या ठाकठीक करण्यास पुरेसा वेळ मिळाला नाही. परंतु ज्यांनी अशा गाड्या मिळविल्या आणि त्या चालू केल्या त्यांना पैसे मिळविण्याचा चांगला मोका मिळाला.

---

## प्रत्येक राष्ट्रीयीकृत बँकेसाठी तीन मंडळे

प्रत्येक राष्ट्रीयीकृत बँकेसाठी १५ सदस्यांचे एक डायरेक्टर बोर्ड असेल. त्या १५ पैकी ५ जण सरकारने नियुक्त केलेले असतील. (कर्मचाऱ्यांचे दोन प्रतिनिधी नियुक्त केले जातील—त्यांपैकी एकाची निवड मध्यम श्रेणीच्या अधिकाऱ्यातून रिझर्व्ह बँक करील आणि दुसऱ्याची निवड बँकेच्या प्रमुख युनियनने दिलेल्या यादीतून केली जाईल.) बोर्डाच्या सदस्यातून सात जणांची एक मॅनेजिंग कमिटी नेमली जाईल. बँकेच्या दैनंदिन कारभारावर तिची देखरेख राहील. तिसरी प्रादेशिक समिती असेल, तिच्यात राज्य सरकारचे मंत्री, पार्लमेंटचे आणि विधानसभेचे सभासद, नागरीक ह्यांचा समावेश असेल. डायरेक्टर बोर्डावर किंवा मॅनेजिंग कमिटीवर एम. पी. किंवा एम. एल. ए. ह्यांना नेमले जाणार नाही. ह्या तीनही मंडळांच्या सदस्यांची नावे पक्की झाली आहेत.

## कंपन्यांच्या नफा-तोटा पत्रकात हा नवा तपशील हवा

६ नोव्हेंबर, १९७१ नंतर ज्यांचे वर्ष संपते, अशा कंपन्यांनी आपल्या नफा-तोटा पत्रकात खालील तपशील दिला पाहिजे, अशी सरकारच्या कंपनी व्यवहार खात्याने नोटिफिकेशन काढली आहे :—(१) दरमहा २,००० रु. पेक्षा जास्त मेहनताना मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या (त्यात रोखीने दिलेल्या रकमा, कॉन्ट्रिब्यूशन्स, दिलेल्या सुखसोई-सवलतींची किंमत, ही सर्व हिशेबात घ्यावयाची आहेत.) (२) उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी प्रत्येक प्रकारच्या मालाच्या बाबतीत लायसेन्स असलेली उत्पादनक्षमता, उभारलेल्या यंत्रसामग्रीची उत्पादनक्षमता, प्रत्यक्ष उत्पादन, खरेदी केलेला कच्चा माल, उत्पादित मालाचा प्रारंभीचा आणि अखेरीचा स्टॉक.

पब्लिक सेक्टरमधील पगारांचे स्केल प्रायव्हेट सेक्टरपेक्षा कमी आहे. वरीलप्रमाणे माहिती उपलब्ध झाली, म्हणजे तुलना करणे सोपे जाईल. आजच्या दराने दर माणशी उत्पन्न दरमहा फक्त ३० रुपये असताना त्याच्या ६० पट उत्पन्न मिळविणारे लोक किती आहेत व ते किती संपत्ती निर्माण करतात, ते त्यामुळे पाहता येईल.

उत्पादन आणि स्टॉक ह्यांच्या तपशीलवार माहितीमुळे कारखान्यांच्या कार्यक्षमतेचा अंदाज लागेल.

## बँक ऑफ अमेरिकेच्या दालनात आर्ट गॅलरी

बँक ऑफ अमेरिकेच्या एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉइंट, मुंबई, येथील कचेरीने आपल्या दालनात आर्ट गॅलरी सुरू केली आहे. नवोदित कलाकारांना आपली कला जनतेपुढे आणण्यास उत्तेजन देणे, हा त्या उपक्रमाचा उद्देश आहे. सध्या तेथे पाच तैलचित्रे आणि काही पुतळे ठेवण्यात आले आहेत. अर्थात मुख्यत: बँकेच्या खातेदारांनाच ह्या कलाकृतींची ओळख होऊ शकेल हे उघड आहे. इतर व्यापारी मंडळ्या, थिएटरे, हॉटेले, इत्यादींना ह्या उपक्रमाचे अनुकरण करण्याजोगे आहे.

## औद्योगिक विकास थांबविण्याच्या सूचना

जगभर पसरत चाललेल्या औद्योगीकरणाच्या लाटेला थोपवून धरण्यात यावे अशा सूचना करणारे वाङ्मय पाश्चात्य देशांतून वाढत चालले आहे. औद्योगीकरणाविषयी दोन विरोधी दृष्टिकोनातून पाहण्यात येत आहे. दोन्ही बाजूंनी संशोधक-शास्त्रज्ञ आणि कुशल तंत्रज्ञ ह्यांनी अनेक साधक-बाधक सिद्धांत मांडले आहेत. एका बाजूने असे सांगण्यात येत आहे की औद्योगिक विकासाची गती रोखण्यात आली नाही तर सुमारे १०० वर्षांच्या आतबाहेर सर्वच मानवी समाजावर फार मोठे अरिष्ट कोसळल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सध्या लोकसंख्येची वाढ वेगाने होत आहे, अन्नधान्याचे उत्पादन वाढत चालले आहे, औद्योगीकरण वेग घेत आहे, जमीन-हवा-पाणी झपाट्याने दूषित होत आहे आणि ह्या सर्वांचा परिणाम म्हणून माणसाभोवतालची नैसर्गिक परिस्थिती त्याच्या अस्तित्वाला मारक ठरत चालली आहे. शास्त्रज्ञांचा व तंत्रज्ञांचा दुसरा पक्ष ही परिस्थिती अमान्य करीत नाही. पण ह्यावर उपाय करणे माणसाच्या हातीं आहे असे त्यांचे म्हणणे आहे. ते म्हणतात की मनुष्यजातीने जननांच्या व मृत्यूंच्या प्रमाणात समतोल आणला पाहिजे, उत्पादनाच्या व उत्पादित मालाच्या वितरणाच्या अधिक चांगल्या पद्धती स्वीकारल्या पाहिजेत, आणि औद्योगिक भांडवल अधिक काळ टिकून कार्यक्षम राहण्यासाठी उपाय योजले पाहिजेत. ही सर्वच उपाययोजना १९७५ पासून सुरू करण्यात आली पाहिजे. १९९० पर्यंत तरी ती अमलात आलीच पाहिजे. ह्यापेक्षा अधिक फुरसत मिळण्याची शक्यता नाही. सध्याच्या जगात सर्वच देशांतील समाज तांत्रिक शोधांनी ढवळून निघत आहेत. अर्थातच त्यांच्या जीवनात एक प्रकारची अस्थिरता उत्पन्न झालेली आहे. ती टाळण्यासाठी वस्तूंच्या हव्यासाला उत्तेजन देण्याऐवजी सांस्कृतिक विकास घडवून आणण्यावर भर देण्यात आला पाहिजे.

## पाकिस्तानात चहाच्या लागवडीसाठी प्रयत्न

पाकिस्तानातून बांगला देश फुटून निघाल्यानंतर तेथून मिळणाऱ्या अनेक वस्तूंना शेष पाकिस्तान मुकला आहे. अशा वस्तूत चहाची गणना आहे. चहाच्या आयातीसाठी पाकिस्तान पूर्वीच्या पूर्व-पाकिस्तानावर अवलंबून होते. ह्याउलट नव्या परिस्थितीत बांगला देशाला चहाच्या निर्यातीसाठी नव्या बाजारपेठा शोधण्याची पाळी आली आहे. पश्चिम पाकिस्तानने आता देशातच चहाची लागवड करणे कितपत शक्य आहे त्याचा अभ्यास करण्यासाठी एक मंडळ नेमले आहे. पाकिस्तानातील काही भागांत चहाची लागवड करता येणे शक्य आहे. परंतु लागवड करण्यात आली तरी ती तातडीच्या गरजा भागवू शकणार नाही. चहाच्या लागवडीसाठी योग्य असलेला प्रदेश निवडून त्यात लागवड करण्यात आली तरी त्यापासून चहाची प्राप्ती होण्यासाठी कितीतरी वर्षे थांबावे लागेल. दरम्यान दुसऱ्या कोणत्या तरी चहा निर्माण करणाऱ्या देशाकडून पाकिस्तनला चहा आयातच करावा लागेल.

### जगातील वाढत्या शस्त्रसंभाराचे प्रचंड ओझे

दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेतील बड्या देशांना शस्त्रास्त्रांची स्पर्धा थांबविण्यात यश आलेले नाही. ह्याच संघटनेत काम करणाऱ्या शास्त्रज्ञांनी व विद्वानांनी शस्त्रास्त्रांवर होणाऱ्या खर्चासंबंधी अभ्यासपूर्वक माहिती ग्रथित केली आहे. त्यावरून असे आढळते की संरक्षणाच्या नावाने जगातील देश जो खर्च करतात त्यापैकी चारपंचमांश खर्च ६ देश करीत असतात. अमेरिका, रशिआ, चीन, फ्रान्स, ब्रिटन आणि पश्चिम जर्मनी हे ते देश होत. रुपयाच्या चलनात हा खर्च १२,००० कोटीपर्यंत पोहोचतो. जगातील सर्व देश मिळून लष्करी सिद्धतेवर दरसाल सुमारे २,००० कोटी डॉलर्स अथवा १४,४०० कोटी रुपये खर्च करीत असतात. जगातील अविकसित देशांपुढे त्वरित सोडविण्यास आवश्यक असे कितीतरी आर्थिक प्रश्न आहेत. पण त्यांना विकसित म्हणजेच औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांची पुरेशी मदत होत नाही. उलट मागासलेल्या देशांतील ऐतिहासिक हेव्यादाव्यांचा फायदा घेऊन आपली सत्ता वाढविण्याचे यत्न पुढारलेल्या देशांतील बडे देश करीत आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात अनेक ठिकाणी स्थानिक युद्धे झाली. त्या युद्धांतून कोणातरी एकाची बाजू घेऊन बड्या देशांनी आपले राजकारण साधण्याचे प्रयत्न केले. गेल्या डिसेंबरमध्ये झालेले चौथे भारत-पाकिस्तान युद्ध त्यापैकीच एक म्हणावे लागेल. ह्याचा अर्थ असा की बड्या देशांच्या जागतिक राजकारणात मागासलेल्या देशांचा सोयीप्रमाणे उपयोग करून घेण्यात येत आहे. म्हणूनच भारतासारख्या जागरूक अलिप्त प्रदेशांनी संरक्षणाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचे धोरण स्वीकारले असून हाल-आपत्ती सोसूनही ते पुढे रेटण्याचे ठरविले आहे. ह्या धोरणाची फळे काही प्रमाणात गेल्या भारत-पाकिस्तान युद्धात दिसून आली. अजूनही धोका दूर झालेला नसल्यामुळे हेच धोरण चालू ठेवण्याशिवाय दुसरा मार्ग नाही.

---

### लोहखनिजाच्या निर्यातीत मंदीचे वातावरण

ह्या वर्षी भारताच्या लोहखनिजाच्या निर्यातीला मंदी आली आहे. खनिजाला जगात असलेली मागणी कमी झाली आहे. त्याचबरोबर खनिजाच्या खाणी आणि ते निर्यात करण्याची बंदरे ह्या दोन्ही ठिकाणी अनपेक्षित अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. खनिजे आणि धातू व्यापार मंडळातर्फे ही निर्यात करण्यात येत असते. मंडळाच्या अंदाजाप्रमाणे १९७१-७२ सालातील निर्यात त्या मागील सालच्या निर्यातीच्या मानाने सुमारे १० लाख टन कमी असण्याचा संभव आहे. १९७०-७१ साली १·२१ कोटी टन लोहखनिज निर्यात करण्यात आले होते. ही निर्यात लक्षात घेऊन मंडळाने ह्या वर्षी १·१५ कोटी टन लोहखनिजाची निर्यात करण्याचे लक्ष्य ठरविले होते पण आलेला अनुभव लक्षात घेता १९७२-७३ साली १·१ कोटी टनापेक्षा अधिक निर्यात करता येईल असे मंडळाला वाटत नाही. त्यातही चिंतेची बाब अशी आहे की खनिज निर्यात करणाऱ्या देशांत चांगली स्पर्धा सुरू झाली आहे. निर्यात करणाऱ्या सर्व देशांनी मिळून लोहखनिजाची किंमत धरून देण्याविषयी प्रयत्न करणे अगत्याचे आहे. पण असा सांघिक प्रयत्न होण्याची चिन्हे दिसत नाहीत. अलीकडे डॉलरचे अवमूल्यन करण्यात आले आहे. त्यामुळे लोहखनिजाची आयात करणाऱ्या देशांनी द्यावयाच्या किमतीत घटच झालेली आहे. खनिजाचे उत्पादन करणाऱ्या देशांनी एकत्र येऊन किमती घसरू न देण्याविषयी काही यंत्रणा निर्माण केली नाही तर खनिज आयात करणारे देश निर्यात करणाऱ्या देशांच्या अडचणींचा गैरफायदा घेत राहणार असे दिसत आहे. अविकसित देशातून निर्यात होणाऱ्या खनिजावर आकारण्यात येणाऱ्या आयातकरात विकसित देशांनी सवलत देण्याचे धोरण तरी अमलात आणले पाहिजे.

---

### ह्या इशाऱ्यांचा उपयोग काय?

अमेरिकेने पाकिस्तानला पुन्हा शस्त्रपुरवठा करण्याचे ठरविले आहे. ह्या निर्णयाविरुद्ध 'दि बाल्टीमोर सन' आणि 'न्यूयॉर्क टाइम्स' ह्या वृत्तपत्रांनी निक्सन सरकारला धोक्याचा इशारा दिला आहे. 'न्यूयॉर्क टाइम्स'ने आपल्या संपादकीयात असे म्हटले आहे की नव्या पाकिस्तानला शस्त्रास्त्रे देणे त्या देशाच्या दृष्टीनेच नव्हे तर आग्नेय आशियात शांतता नांदण्याच्या दृष्टीनेही हितकारक नाही. गेली दोन दशके अमेरिकेने पाकिस्तानला लष्करी मदत दिली. त्याचा परिणाम पाकिस्तानात लष्करी वर्चस्व स्थापन व हिंदी उपखंडात संघर्ष उत्पन्न होण्यात झाला. 'सन' पत्राने असे म्हटले आहे की भारताविरुद्ध पाकिस्तानची लष्करी सत्ता उभी करणे खुद्द पाकिस्तानच्या हिताला तर बाधक आहेच, पण अमेरिकेच्या हितसंबंधांनाही त्यामुळे धोका पोहोचण्याचा संभव आहे.

---

### स्वस्तिकचे बिझिनेस मॅनेजर आणि एक्स्पोर्ट मॅनेजर ह्यांचे रशिया-युरोपचे दौरे

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. चे बिझिनेस मॅनेजर, श्री. डी. डी. बेनाडीकर हे रशिआ आणि बल्गेरिया ह्या देशांकडे जाण्यास २ मार्च रोजी निघाले. बैरुत आणि सुदानला जाऊन ते २० मार्च रोजी भारतात परत येतील. ह्या सर्व देशांकडे स्वस्तिकची बरीच निर्यात होत असते.

स्वस्तिकचे एक्स्पोर्ट मॅनेजर श्री एस. बी. केरूर हे युरोपियन कॉमन मार्केटच्या बाजारपेठेचा अभ्यासासाठी ५ मार्च रोजी येथून निघाले. ते २८ मार्च रोजी परत येतील. केमिकल अँड अलाइड प्रॉडक्ट्स, एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल, कलकत्ता, ह्यांनी त्यांच्या दौऱ्याचा पुरस्कार केलेला आहे. जर्मनी, बेल्जम, हॉलंड, स्वीडन, फ्रान्स, स्वित्झरलंड, इटली, इंग्लंड ह्या देशांत ते जाऊन येतील.

## अफूच्या आयातीत कपात करण्याचा अमेरिकेचा विचार

अमेरिकेने अफूची आयात कमी करण्याचा विचार चालविला आहे. त्यामुळे अफू निर्यात करणाऱ्या भारतासारख्या देशांना व्यापारी धक्का निर्माण होऊ पाहत आहे. अफूपासून काही औषधी द्रव्ये तयार करण्यात येतात. ती तयार करण्यासाठी अमेरिका कृत्रिम अफू तयार करण्याचा विचार करीत आहे. तथापि ह्या बाबतीतील तज्ज्ञांचे मत असे आहे की अफूपासून मिळू शकणाऱ्या औषधी द्रव्यांची सर इतर तत्सम द्रव्यांना येणार नाही. अमेरिकेत अमली पदार्थांच्या सेवनाचा तरुण वर्गात फारच प्रसार झालेला आहे. असे काही पदार्थही अफूपासून तयार करण्यात येतात आणि त्यांचा बेकायदा व्यापार फार मोठ्या प्रमाणावर चालतो. व्हिएटनाममधील सैनिकांतही अमली पदार्थ घेण्याचा खूप प्रसार झालेला आहे. अमली पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्यावर घातक परिणाम होतात हेही एक कारण अमेरिकेच्या नव्या धोरणामागे असावे. शास्त्रीय व औषधी उपयोगासाठी लागणारी अफू पुरविण्यात भारताचा पहिला क्रमांक आहे. जगाच्या मागणीपैकी ८० टक्के मागणी भारत पुरवितो. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, प. जर्मनी, इटली, जपान, स्पेन इत्यादी देशांना अफूचा पुरवठा करण्यात येतो. १९७०–७१ साली अफूच्या निर्यातीने भारताला ८·६ कोटी रुपयांचे परदेशी चलन मिळाले. चालू आर्थिक वर्षात ही प्राप्ती ११ कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. अफूचे उत्पादन भारतात उत्तरेकडील काही राज्यांत होते. ग्वाल्हेर येथे नेमण्यात आलेला सरकारी कमिशनर अफूच्या लागवडीवर नियंत्रण ठेवतो. अफूपासून तयार होऊ शकणाऱ्या औषधी द्रव्यांचा एक कारखाना मध्यप्रदेशात काढण्याचे घाटत आहे. अमली औषधांच्या निर्मितीबद्दलच्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कमिशनची बैठक सध्या चालू आहे. त्यात भाग घेण्यासाठी भारत आपले प्रतिनिधीमंडळ पाठवत आहे.

---

## युद्धामुळे रेल्वे खात्याला झालेला तोटा

रेल्वे बोर्डाने केलेल्या अंदाजाप्रमाणे नुकत्याच झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धामुळे रेल्वेचे सुमारे ७ कोटी रुपयांचे नुकसान झाले. युद्धजन्य परिस्थितीमुळे अनेक प्रवासी व मालवाहू गाड्या रेल्वेला रद्द कराव्या लागल्या. लष्कराची हालचाल आणि युद्धासाठी लागणारा पुरवठा करण्याच्या कामी ह्या रद्द झालेल्या गाड्या वापराव्या लागल्या. अर्थात गाड्यांपासून मिळणारे उत्पन्न बुडाले. सप्टेंबरपासून युद्ध संपेपर्यंतच्या काळात रेल्वेखात्याने १,७८९ लष्करी खास गाड्या सोडल्या. त्याशिवाय रुग्णवाहन करणाऱ्या गाड्या व छोट्या अंतरावर जाणाऱ्या गाड्या सोडल्या त्या वेगळ्या. पुष्कळदा लष्करी गाड्यांना मार्ग देण्यासाठी मामुली गाड्यांचा खोळंबाही करावा लागला. मामुली गाड्यांचे प्रवासी व मालवाहतुकीचे दर आणि लष्कराकडून मिळणारे दर ह्यांत फरक आहे. त्यामुळे नुकसानीत आणखी भर पडली.

---

## आकर्षक बांधा ठेवण्याची सक्ती

सौंदर्य स्पर्धेत विजयी ठरणाऱ्या रूपसुंदर तरुणींची अगदी कसून परीक्षा केली जाते. विमानांतून प्रवाशांच्या सुखसोयीकडे पाहणाऱ्या हवाई सुंदरींची इतकी कडक परीक्षा होत नसावी. तरी सुद्धा त्यांनी बेढब दिसू नये म्हणून सर्वच विमानकंपन्या खबरदारी घेत असतात. पण निवड केलेल्या सुंदरीचा बांधा सदासर्वदा आकर्षक कसा राहणार? अनेक कारणांनी त्या बेढब दिसू लागण्याची शक्यता असते. अमेरिकेतील युनायटेड एअर लाइन्स ही कंपनी ह्याबाबतीत फार चोखंदळ आहे. वेड्यावाकड्या सुटलेल्या हवाई सुंदरी विमान प्रवाशांना आवडत नाहीत असे ह्या मोठ्या कंपनीला वाटते. म्हणून कंपनी आपल्या हवाई सुंदरीचे दरमहा वजन करते. ५ फूट, २ इंच उंची असलेल्या सुंदरीचे वजन ११५ पौंडांपेक्षा अधिक असता कामा नये आणि ६ फुटांच्या सुंदरीचे वजन १५६ पौंडांपेक्षा अधिक असता कामा नये असा कंपनीचा नियम आहे. ह्या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या सुंदरींना प्रथम विमानातून धाडण्याचे बंद करण्यात येते. नंतरही तिने आपले अंगकाम आकर्षक केले नाही तर तिला नोकरीवरून कमी करण्यात येते. गेल्या काही महिन्यांत कंपनीने ४५ हवाई सुंदरींना कामावरून तात्पुरते कमी केले आणि चौघींना अर्धचंद्र दिला. अमेरिकेत सध्या स्त्रियांच्या अनिर्बंध स्वातंत्र्याची चळवळ जोर धरू लागली आहे. तेव्हा कंपनीच्या हवाई सुंदरी मुकाट्याने स्वस्थ बसणे शक्य नव्हते. आता हवाई सुंदरींनी कंपनीकडे जोराचा निषेध व्यक्त केला आहे. पाच वर्षांपूर्वी ह्याच कंपनीने असा नियम केला होता की ३२ वर्षांपुढील हवाई सुंदरींना कामावर ठेवावयाचे नाही. कारण त्यांची लैंगिक आकर्षकता ओहोटीला लागलेली असते. ह्या नियमाविरुद्ध सुंदरींनी चळवळ करून कंपनीला ती मागे घ्यावयास लावली होती. अमेरिकेतील कोर्टांनी विवाहोत्तर व मातृपद प्राप्त झाल्यानंतरही नोकरीत राहण्याचा त्यांचा हक्क मान्य केलेला आहे.

---

## काश्मीरच्या उल्लेखाचा भुत्तो फायदा घेणार?

अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. निक्सन ह्यांनी चीनला दिलेल्या भेटीनंतर उभयतांचे म्हणून एक संयुक्त पत्रक काढण्यात आले आहे. ह्या पत्रकात काश्मीरच्या प्रश्नाचा उल्लेख करण्यात आला आहे. त्याचा फायदा घेऊन भारत-पाकिस्तानातील संभाव्य वाटाघाटीत प्र. भुत्तो काश्मीरच्या प्रश्नाला पुन्हा नव्याने चालना देण्याची शक्यता आहे. मात्र ह्याबाबतीत अमेरिकेच्या व चीनच्या भूमिकेत पूर्ण एकमत नाही. चीनने काश्मीरचा प्रश्न स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर सोडवावा आणि भारताने युद्धबंदी रेषेपलीकडे आपल्या फौजा काढून घ्याव्या अशी भूमिका घेतली आहे. अमेरिकेने फौजा काढून घेण्यालाच पाठिंबा दिलेला आहे. स्वयंनिर्णयाला तिचा पाठिंबा दिसत नाही. तथापि दोन्ही देशांना १९६५ च्या युद्धानंतर अस्तित्वात आलेली युद्धबंदी रेषाच अभिप्रेत आहे.

---

### गंगा-कावेरी नद्या जोडणारा कालवा

गंगा व कावेरी नद्यांना जोडणारा कालवा खोदण्याची योजना सरकारच्या विचाराधीन आहे. ह्या प्रचंड योजनेच्या व्यवहार्यतेची पाहणी करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेचे एक अभ्यासमंडळ अलीकडे भारतात येऊन गेले. स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने ही योजना अमलात आणण्यास काही अडचण नाही असे मत मंडळाने व्यक्त केले आहे. आता संयुक्त राष्ट्र संघटनेचा आणखी एक तज्ज्ञ योजनेची आर्थिक पाहणी करण्यासाठी भारतात येणार आहे. त्याचा दौरा तीन आठवड्यांचा आहे. अविकसित देश खूप पैसा खर्च करून विकासाची कामे करीत आहेत, पण युद्धासारख्या प्रसंगी ह्या योजनांना धोका पोचतो, मध्यवर्ती सरकारचे वीज व पाणीपुरवठा मंत्री डॉ. राव ह्यांनी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या नव्या सरचिटणिसांना अशी सूचना केली आहे की नदीखोरे-विकास योजनांवर बाँबफेक करण्यात येऊ नये, असा प्रघात पाडण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

---

### टेलिव्हिजनचा सिनेमावर परिणाम

टेलिव्हिजनच्या प्रसारामुळे ग्रेट ब्रिटनच्या सिनेमा धंद्यावर परिणाम झाला आहे. १९६५ मध्ये दर आठवड्याला ६४,००,००० सिनेमा तिकिटे खपत असत; १९७० साली ४२,४०,००० तिकिटे खपली. ह्याच काळात टेलिव्हिजनच्या परवान्यांची संख्या १,३५,००,००० वरून १,५६,००,००० वर गेली. सहाजिकच, सिनेमागृहांची संख्या १,९७१ वरून १,५८१ वर उतरली आणि त्यात आत २०,००,००० ऐवजी १५,००,००० लोकांची बसण्याची सोय आहे.

---

### चार्ली चॅपलिनचे चित्रपटांचे हक्क विकले

चार्ली चॅपलिनने आपल्या ११ सुप्रसिद्ध चित्रपटांच्या प्रदर्शनाचे अधिकार नुकतेच विकले. त्यापासून त्याला ४ कोटी रु. रोख मिळाले आणि टेलिव्हिजनवर ते चित्रपट दाखविण्यासाठी मिळणाऱ्या उत्पन्नाच्या ६०% रकम मिळत राहील. "मी आता म्हातारा झालो आहे. माझे बालपण अत्यंत दारिद्र्यात गेले होते. माझे कुटुंबही मोठे आहे" चॅपलिनने खुलासा केला आहे.

---

**प्रवासी मार्गदर्शकांना प्रशिक्षण** – प्रवाशांना मार्गदर्शन करून त्यांची सोय लावणाऱ्या नोकरांना प्रशिक्षण देण्याचे एक केंद्र बंगलोर येथे स्थापन करण्यात येणार आहे. हे केंद्र भारतात अशा प्रकारचे पहिलेच होईल व ते भारत सरकार आंतरराष्ट्रीय प्रवास घडवून आणणाऱ्या एका संघटनेच्या साह्याने चालवील. त्याच्या स्थापनेसाठी ३ कोटी रुपये खर्च करण्यात येतील.

**बँकेला पाच दिवसांचा आठवडा!** — सरप्या बँकिंग कमिशनने बँकांना शनिवारीही सुट्टी असावी असे सुचविले आहे. परंतु सरकारला ही शिफारस मान्य होईल असे दिसत नाही.

**रेल्वेच्या सामानाची निर्यात**— सरकारी मालकीच्या हेवी इक्विपमेंट कॉर्पोरेशनने १० कोटी रुपयांचे रेल्वेचे साहित्य १९७१–७२ साली परदेशी निर्यात केले आहे. त्यात मालवाहू डबे आणि इतर यांत्रिक साधनांचा समावेश आहे. ही सामग्री पोलंड, हंगेरी, सुदान, युगोस्लाव्हाकिआ, ब्रह्मदेश, थायलँड, इत्यादी देशांना पाठविण्यात आली. १९७२–७३ साली पुरवठा करण्यासाठी ५४ कोटी रुपयांच्या मालाच्या मागण्या कॉर्पोरेशनकडे नोंदविण्यात आल्या आहेत.

**डिझेल रेल्वे एंजिनांचे सुटे भाग**—भारतामधील रेल्वे वाहतूक आता डिझेल एंजिनांच्या साह्याने अधिक करण्यात येऊ लागली आहे. काही एंजिने अमेरिकेतून आयात केलेली आहेत. त्यांना लागणारे सुटे भाग आता मिळू शकत नाहीत. कारण अमेरिकेने भारताची मदत बंद केली आहे. एंजिनांना लागणारे भाग बनविण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी हिंदमधील निरनिराळ्या रेल्वे विभागांच्या प्रमुखांची बैठक दिल्ली येथे भरविण्यात आली होती.

**१० हजारांचे तैलचित्र ७ लक्ष रुपयाला** — बडोद्याच्या माजी महाराणीने एका ब्रिटिश अपील कोर्टाकडे मि. डॅनिअल ईल्डेनस्टीन ह्या कलाकृतींच्या व्यापाऱ्यावर खऱ्या किमतीपेक्षा भलत्याच किमतीला आपणास एक तैलचित्र विकल्याबद्दल दावा लावण्याची परवानगी मागितली आहे. व्यापाऱ्याने महाराणीला ७ लक्ष रुपयांना जे तैलचित्र विकले, त्याची खरी किंमत तज्ज्ञांच्या मते १० हजार रुपये सुद्धा नाही, अशी महाराणीची तक्रार आहे.

**३३% परदेशी प्रवासी मुंबईत उतरले** — गेल्या वर्षी भारतात आलेल्या परदेशी प्रवाशांपैकी ३२·९% प्रवासी मुंबईत उतरले, तर दिल्लीत ३१·६% उतरले. मद्रासचा वाटा ९·३% आणि कलकत्त्याचा वाटा ७·६% भरला. पाकिस्तानी नागरिक सोडून एकूण ३,००,९९५ प्रवासी भारतात आले; १९७० साली २,८०,८२१ आले होते. पूर्व आशिया आणि आफ्रिका येथून भारतीयांना येथे येणे भाग पडले, त्यामुळे प्रवाशांची संख्या वाढलेली दिसते.

**कॅन्सरच्या रुग्णांना विमान भाड्यात सवलत** — भारतातून कोठूनही मुंबईला इंडियन एअरलाइन्सनी येणाऱ्या कॅन्सरच्या रुग्णाला परतीच्या नेहमीच्या दराच्या निम्मे भाडे आकारले जाईल.

**कुष्ठरोग्यांसाठी स्वतंत्र पोलिंग स्टेशन्स** — प. बंगालमधील बंकुरा जिल्ह्यात कुष्ठरोग्यांसाठी तीन स्वतंत्र मतदानकेंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती.

**मतदानकेंद्रात मतदार स्त्रीची प्रसूती** — म्हैसूर राज्यातील शिमोगा जिल्ह्यातील एका मतदानकेंद्रात एका शेतकरी स्त्रीने मतदान केले आणि ती तेथेच प्रसूत झाली.

---

## फ्रान्सला जिवंत बेडकांची निर्यात

पश्चिम युरोपात आणि अतिपूर्वेकडील देशांत बेडकांपासून बनविलेल्या रुचकर खाद्यपदार्थांची फार मागणी आहे. अर्थातच अविकसित देशांतील नद्यानाल्यांतून व तळ्यांतून सापडणाऱ्या ह्या प्राण्यांवर संक्रात आली आहे. इंडिअन एअर लाईन्स भारतामधून जिवंत बेडूक निर्यात करण्याच्या खटपटीत आहे. पण त्यासाठी निर्यात व्यापार प्रमुखाच्या परवान्याची गरज आहे. अलीकडे एका फ्रेंच कंपनीचा प्रतिनिधी भारतात आला होता. जिवंत बेडूक प्लॅस्टिकच्या अगर पुठ्ठ्याच्या आवरणात भरून फ्रान्सला पाठविण्याबद्दल त्याने वाटाघाटीही केल्या आहेत. ह्या वाटाघाटी यशस्वी झाल्यास भारतामधून दररोज १ टन बेडूक परदेशी निर्यात होऊ लागण्याची शक्यता आहे. सध्या बेडकांचे संस्कारित डबाबंद पायच कायद्याप्रमाणे निर्यात करता येतात. ह्या निर्यातीमुळे भारताला परदेशी चलनाची चांगली प्राप्ती होते. भाताच्या खाचरांतून बेडूक पुष्कळ मिळतात. पण त्यांच्या नाशामुळे भातावरील कीड फोफावण्यास मदत होते.

---

## म्हशीचे दूध अधिक सकस करण्याचा प्रयत्न

लहान मुलांची चांगली वाढ होण्यास आईचे दूधच चांगले हे आहारशास्त्रज्ञांनी मान्य केलेले आहे. परंतु अनेक कारणांनी आईला पुरेसे दूध येत नाही. ह्यावर उपाय म्हणून मुलांसाठी दुधाच्या भुकटीचे डबे मिळतात. तथापि आईच्या दुधाची सर ह्या दुधाला येत नाही. परिणामी छोट्यांच्या मूत्रपिंडावर ताण पडतो. आईचे दूध मुलांच्या मेंदूची नीट वाढ होण्यास आवश्यक असते. हरयाणा राज्यातील डेअरी रिसर्च इन्स्टिट्यूटने म्हशीच्या दुधात सुधारणा करून आहारदृष्ट्या लहान मुलांना ते योग्य करण्याचे प्रयत्न चालविले आहेत त्यासाठी स्वित्झरलंडकडून आणलेल्या एका गाईचा स्थानिक रेड्याशी संकर करून एक नवी दुधाळ जात त्यांनी तयार केली आहे. ही जात दोन वेताच्या दरम्यान ३,५०० लिटर दूध देते. ह्या जातीची जनावरे दोन वर्षांत बाजारात मिळू लागतील असा अंदाज आहे.

---

**भ्रष्टविलेल्या बांगला स्त्रिया**—पाकिस्तानी लष्कराने बांगला देशातील लोकांवर विशेषतः त्यातील स्त्रियांवर अमानुष अत्याचार केले. लष्कराच्या पाशवी वासनांना बळी पडलेल्या स्त्रियांची संख्या सुमारे २ लाख इतकी मोठी आहे. या स्त्रियांशी विवाह करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन बांगला देशाचे पंतप्रधान शेख मुजीबर रहमान ह्यांनी केले आहे. १९४७ साली भारताची फाळणी झाली तेव्हाही हाच प्रश्न उपस्थित झाला होता. त्या वेळी अनेक हिंदी नागरिकांनी आपल्या स्त्रिया परत आल्यावर त्यांच्याशी लग्ने केली होती.

---


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣


फोन नं. :- ३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



चवदार पिठासाठी

पिठांच्या चक्क्या
• बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
• मजबूत बांधणी
• अद्यावत् यंत्र योजना
• साईज १४", १६", १८"

फोन नं. १६९



उत्पादक –
भिडे अँड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.

### जीवन सुखी करणारे शोध वापरलेच गेले नाहीत

शास्त्रीय शोधावर आधारलेल्या अनेक उपयुक्त वस्तू आज घराघरांतून वापरल्या जात आहेत. असे शोध व त्यांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करण्याचे सध्याचे युग आहे. परंतु मानवी इतिहासात कितीतरी शोध शेकडो वर्षांपूर्वी लागूनही त्यांचा जीवनावर काही परिणाम झाला नाही. इतिहासातील अनेक अनुत्तरित कोड्यांपैकीच हे एक कोडे आहे. पोपोव्ह नावाच्या संशोधकाने रेडिओचा शोध लावला होता. पण त्याचा हा शोध म्हणजे सैतानी जादू आहे असे समजून लोकांनी तो नष्ट केला. प्राचीन काळी रोममधील एका एंजिनिअराने पाण्याच्या लोंढ्यावर चालणारी पिठाची चक्की तयार करून ती चालवूनही दाखविली होती. तिची उपयुक्तता सहज पटण्यासारखी होती. पण त्या वेळच्या राज्यकर्त्यांनी गुलाम आळशी बनतील म्हणून या शोधाचा वापर करू दिला नाही. प्राचीन इजिप्तमध्ये पाणी खेचण्यासाठी वाफेच्या पंपाचा शोध लावण्यात आला होता. कामगार आळसावतील म्हणून तोही अखेर स्मृतिशेष झाला. मध्ययुगात बगदाद शहरात विजेरीचा शोध लावण्यात आला होता. तो काळ परंपरागत पद्धतीने हातांनी काम करण्याचा होता. चालू धंद्यावर परिणाम होऊ नये म्हणून विजेरीचा उपयोग करण्यात आला नाही. भारतात न गंजणाऱ्या लोखंडाचा शोध लागलेला होता. विजापूर येथील घड्याळाच्या टिकटिकीचाही प्रतिध्वनी देणारा गोलघुमट प्रसिद्धच आहे. अनेक देशांच्या इतिहासात अशा प्रकारची उदाहरणे सापडू शकतील. सध्याच्या यंत्रप्रधान युगात सर्व शोध सुमारे २०० वर्षांपूर्वीपासून लागले असा समज रूढ झाला आहे. पण तो वाटतो तितका खरा नाही. पूर्वी बरेच शोध लागून नंतर ते लुप्त झाले असा दावा काही इतिहासज्ञ करीत असतात. त्यांचे म्हणणे सहज झटकण्यासारखे दिसत नाही.

### सर्कशीच्या धंद्याला वाईट दिवस

सर्कस हा करमणुकीचा प्रकार आता बंद पडण्याच्या मार्गावर आहे. मुळात हा धंदा अनेक अडचणींना तोंड देऊन चालवावा लागतो. पण आता त्याच्यावर नवीनच संकट ओढवले आहे. दूरदर्शन घडविणाऱ्या पडद्यावर सर्कशीचा चित्रपट दाखविण्यात येऊ लागल्यापासून अनेक शौकीन लोक खऱ्याखुऱ्या सर्कशीला जाण्याचा कंटाळा करून घरातल्या घरातच ती पाहाणे पसंत करू लागले आहेत. करमणुकीच्या प्रकारात स्वतः भाग न घेता बैठी करमणूक करून घेण्याची वृत्ती यंत्रयुगात जोराने फैलावत आहे, त्याचाच हा परिणाम आहे. शिवाय सर्कशीत काम करणारे कलाकार मिळविणे व पशूंना शिकविणारे मास्तर मिळविणेही अवघड होत चालले आहे. सर्कस चालविण्याचा खर्चही अफाट वाढला आहे.





नाण्याला तीन बाजू असतात...

दोन नेहमीच्याच आणि तिसरी बाजू परीघ (जाडी)

युनायटेड वेस्टर्न बँकेत रक्कम गुंतविल्याने नाण्याचा परीघ वाढतो म्हणजेच रकमेत वाढ होते. आकर्षक व्याज दराच्या गरजेनुरूप विविध ठेव योजना.

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.


मुख्य कचेरी: चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा.

स्थापना: १९३६ महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा शेड्यूल्ड बँक

वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झीक्युटर कंपनी लि.

बँकेच्या या सलग्न संस्थेमार्फत विश्वस्त निधी व व्यवस्थापनाची कामे केली जातात






GADRE BROTHERS
ENGINEERS & FOUNDERS
MADHAVNAGAR (S. Rly.)
Phone : 318 Gram : 'SEWA
@Sangli Madhavnagar

BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth,**
**BELGAUM**

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our Branches – Bombay Office at Mandvi, Bombay – 9.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

**S. Y. KAMAT** — *General Manager.*
**K. B. KIRTIKAR** — *Chairman.*

**ओगले**

**प्रभाकर कंदील**

◆ अंधाऱ्या रात्री,
◆ वादळी वाऱ्यात,
◆ ओबड-धोबड रस्त्यावर,
◆ खवळलेल्या दर्यावर

**मार्गदर्शक व विश्वसनीय.**

तयार करणार
ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड
ओगलेवाडी ( जि. सातारा )

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| सांपत्तिक स्थिती | ३०–६–१९७१ रोजी |
|---|---|
| १. भांडवल व निधी | रु. १८८५ लाख |
| २. ठेवी | रु. ९३३२ लाख |
| ३. कर्जे | रु. १४१८९ लाख |
| ४. एकूण खेळते भांडवल | रु. १९५५१ लाख |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिल वसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

डॉ. या. सु. श्रीश्रीमाळ — कार्यकारी संचालक
श्री. वसंतराव दादा पाटील — अध्यक्ष

| तारेचा पत्ता : "मॉर्गेज" | दूरध्वनी | मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स) कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाइन) उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६ |
|---|---|---|

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.**

जे. के. बिल्डिंग, २ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७१ अखेर बँकेचे भागभांडवल ८ कोटी ८७ लाख, गंगाजळी ६९ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ४५ कोटी व येणे कर्ज ११५·५५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी — अध्यक्ष

रा. गो. गोखले — व्यवस्थापक
जी. पी. भावे — कार्यकारी संचालक

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविश्राम' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )